| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br>**प्रेसनोट** | 2025<br>CB/ 27/2025 |
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | | **दिनांक १९.०५.२०२५** |

**‘‘ अलमो स्पा, शॉप नंबर २१४, दुसरा माळा, सतरा प्लाझा, सेक्टर १९ डी, वाशी नवी मुंबई येथे मसाजच्या नावाखाली सुरू स्पा सेंटर असलेल्या वेश्याव्यवसायातुन सहा पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका ’’**

---

श्री. मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त ( गुन्हे ), श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त, ( गुन्हे ), यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि/पृथ्वीराज घोरपडे यांना त्याचे गुप्त बातमीदारांमार्फत दिनांक १७/०५/२०२५ रोजी ‘‘ अलमो स्पा, शॉप नंबर २१४, दुसरा माळा, सतरा प्लाझा, सेक्टर १९ डी, वाशी नवी मुंबई येथिल स्पा सेंटर मध्ये स्पाच्या नावाने तेथे असलेल्या महिलाकडुन जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेत असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली ’’ त्याबाबत सदर बातमीची शहानिशा करून कारवाई केली.

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास अलमो स्पा, शॉप नंबर २१४, दुसरा माळा, सतरा प्लाझा, सेक्टर १९ डी, वाशी नवी मुंबई या ठिकाणी पाठवुन बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशा-यावरून दिनांक १७/०५/२०२५ रोजी १६.१८ वाजता पथकाने छापा टाकला असता, सदर ठिकाणी सहा महिला मिळुन आल्या. नमुद स्पाचे मालक अभिजीत यांनी बनावट ग्राहकास मुली दाखवुन वेश्यागमनाचा मोबादला म्हणुन ७०००/- रूपये स्वीकारून मॅनेजर प्रणाली गवसकर हिने बनावट ग्राहकाची स्वत:च्या हस्ताक्षरामध्ये नोंद घेतली. तसेच नमुद स्पा मध्ये मॅनेजर संजय उर्फ रेहमत इलाही शेख हे देखील मिळुन आले.

सदर बाबत आरोपी १) अभिजीत मुतुकुमार नायडु, वय २९ वर्ष, धंदा स्पा मालक, २) प्रणाली पाडुरंग गवसकर, वय ३४ वर्ष, व्यवसाय स्पा मॅनेजर, ३) संजय उर्फ रेहमत इलाही शेख, वय ४२ वर्ष, धंदा स्पा मॅनेजर यांनी आपसात संगनमत करून सहा पिडीत महिलांना बॉडी मसाज करण्याच्या नावाने ठेवून नमुद शॉप वेश्याव्यवसायाकरीता वापरला असल्याचे आढळुन आले.

**म्हणून वरील तिन्ही आरोपी यांच्या विरुध्द एपीएमसी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर २९४/२०२५ बीएनएस कलम ३ (५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये दिनांक १८/०५/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास एपीएमसी पोलीस ठाणे करत आहे.**

**सदर गुन्हयात तीन आरोपी यांना आज दिनांक १८/०५/२०२५ रोजी १३.५६ वाजता अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने दिनांक २१/०५/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला आहे.**

सदरचे कारवाई मध्ये अपर पोलीस आयुक्त (गुन्हे),दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त,अमित काळे गुन्हे शाखा, नवी मुंबई व सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/ पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, सपोनि/अलका पाटील, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/ मांडोळे, पोशि/ ठाकुर, पोशि/चव्हाण, पोहवा/ म्हात्रे, पोहवा/ अडकमोल, पोहवा/धोनसेकर चालक पोहवा/ हांडे हे सहभागी होते.

★★★★★★★★★★